# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:04.06.2025** **वार:बुधवार**

1. रोगमुक्त रोपांसाठीच्या 'क्लिन प्लांट' कार्यक्रमांतर्गत सर्वाधिक केंद्र महाराष्ट्रात उभारणार-केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंग चौहान यांची घोषणा
2. कृषी क्षेत्रातील तंत्रज्ञान शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत पोहोचवणं गरजेचं-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस
3. प्रत्येक गरिबाला घर देण्यास सरकार कटिबद्ध असल्याची केंद्रीय ग्रामविकास मंत्री शिवराजसिंग चौहान यांची ग्वाही
4. राज्य अनुसूचित जमाती आयोगाची स्थापना करण्याला राज्य मंत्रिमंडळाची मंजुरी
5. ऑपरेशन सिंदूरद्वारे भारतीय हवाई दलाने इतिहास घडवला-सरसेनाध्यक्ष जनरल अनिल चौहान यांचं प्रतिपादन आणि
6. आय पी एल मध्ये रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाला विजेतेपदाचा मान

**कृषी हॅकॅथॉन**

रोगमुक्त रोपांसाठी देशात 'क्लिन प्लांट' कार्यक्रम राबवण्याची घोषणा केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंग चौहान यांनी काल पुण्यात केली. कृषी महाविद्यालयात आयोजित पहिल्या कृषी हॅकॅथॉनच्या समारोप सभारंभात ते बोलत होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह अन्य मान्यवर यावेळी उपस्थित होते. या उपक्रमातील विजेत्यांना या सोहळ्यात पारितोषिके देण्यात आली. यावेळी बोलताना चौहान म्हणाले...

**और महाराष्ट्र के किसानों ने अपनी मेहनत से और सरकार के सहयोग से हॉर्टिकल्चर के क्षेत्र में जो प्रगति और विकास की है, उसके लिए मैं आप सबको हृदय से बधाई देता हूँ। आपने हिंदुस्तान को दिशा दिखाई है। अब क्लीन प्लांट प्रोग्राम हम हिंदुस्तान में शुरू करने जा रहे हैं। भारत सरकार नौ पूरे देश में बनाएंगे लेकिन सबसे ज्यादा हॉर्टिकल्चर तो महाराष्ट्र में होता है, इसलिए नौ में से तीन क्लीन प्लांट महाराष्ट्र में बनाए जाएंगे। अंगूर के क्लीन प्लांट के लिए जो प्रोग्राम शुरू होगा वो होगा पुणे से पुणे की इस पवित्र धरती से संतरे के लिए जो क्लीन प्लांट प्रोग्राम होगा। वो होगा संतरा नगरी नागपुर से और अनार के लिए क्लीन प्लांट प्रोग्राम शुरू होगा सोलापुर से और इन तीनों को बनाने में हम तीन सौ करोड़ रुपया खर्चा करेंगे। क्लीन प्लांट मिलेंगे हमारे किसानों को जिनमें कोई रोग नहीं होगा, कोई वायरस नहीं होगा और हमारा किसान धोखा नहीं खाएगा।**

या कार्यक्रमात बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.....

**आमच्या राज्याचे पंचेचाळीस टक्के लोकं रोजगाराकरता कृषीवर अवलंबून आहेत. जर शेतकऱ्याला बाहेर काढायचं असेल त्याचं उत्पादन खर्च कमी करायचा असेल त्याची उत्पादकता वाढवायची असेल त्याला मार्केटशी जोडायचं असेल तर त्याच्यावर उपाय तंत्रज्ञानच आहे आणि म्हणून अशा प्रकारचे वेगवेगळे तंत्रज्ञान. जे विकसित करण्यात आलेले आहेत त्यांची स्पर्धा आज या ठिकाणी आपण भरवली आणि नुसती स्पर्धा भरून आपण थांबत नाही आहोत तर यातले ज्या लोकांना या ठिकाणी पुरस्कार दिलेला आहे त्यांचं इन्क्युबेशन करणं आणि त्यांना एका सक्सेसफुल स्टार्टअपमध्ये परिवर्तित करणं हे देखील या हॅकेथॉनचा पुढचा टप्पा असणार आहे जेणेकरून तंत्रज्ञान हे केवळ संशोधकापुरतं त्या ठिकाणी न राहता ते तंत्रज्ञान शेतीपर्यंत बांधापर्यंत शेतकऱ्यांपर्यंत पोहोचलं पाहिजे अशा प्रकारची त्याची स्केलेबिलिटी त्याचं स्टँडर्डायझेशन करायचं हा देखील या माध्यमातून प्रयत्न आहे.**

**शिवराज सिंग चौहान-नारायणगाव**

तत्पूर्वी काल सकाळी केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी विकसित कृषी संकल्प अभियाना अंतर्गत पुणे जिल्ह्यात नारायणगाव तालुक्यातील कृषी विज्ञान केंद्रात शेतकऱ्यांशी संवाद साधला. शेतकऱ्यांना बनावट खतं किंवा कीटकनाशकं पुरवणाऱ्या

कंपन्या अथवा व्यक्तीविरुद्ध कठोर कारवाई करण्याची तरतूद असलेला कायदा करण्याचा केंद्र सरकारचा प्रयत्न आहे, असं चौहान यावेळी म्हणाले.

**<u>आवास योजना</u>**

प्रत्येक गरिबाला घर देण्यास केंद्र आणि राज्य शासन कटिबद्ध असून, या पुढील काळात महाराष्ट्रात एकही गरीब बेघर नसेल, अशी ग्वाही केंद्रीय ग्रामविकास मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी काल पुण्यात दिली. प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण, लाभार्थी मेळावा आणि महाआवास अभियान राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यावेळी उपस्थित होते. शिवराज सिंग चौहान यांच्या हस्ते मुख्यमंत्री फडणवीस यांना 'दहा लाख घरांचं उद्दिष्ट पत्र प्रदान' करण्यात आलं. यावेळी बोलताना चौहान म्हणाले.......

**आज दो हज़ार अठारह की सूची आज के दस लाख के मकानों के बाद जो पत्र मैंने माननीय मुख्यमंत्री जी को सौंपा है अब एक भी गरीब बिना मकान के नहीं रहेगा जिसका दो हज़ार अठारह की सूची में नाम था हर एक को मकान मिलेगा पैंसठ हज़ार करोड़ रुपया। ये राज्य है महाराष्ट्र जो अपने गरीबों का मकान बनाने के लिए एक साल में लगा रहा है। तीस लाख मकान अभी एक साल पूरा नहीं हुआ और तीस लाख मकान देने का सौभाग्य मिल गया ये भगवान की कृपा है मोदी जी का विजन है प्रभु का आशीर्वाद है।**

**<u>मंत्रिमंडळ निर्णय</u>**

महाराष्ट्र राज्य अनुसूचित जमाती आयोगाची स्थापन करण्याचा निर्णय काल राज्य मंत्रिमंडळानं घेतला. या आयोगासाठी पदनिर्मिती, जागा आणि अनुषंगिक खर्चासाठी 4 कोटी 20 लाख रुपयांच्या तरतुदीलाही मंजुरी देण्यात आली. छत्रपती संभाजीनगर इथ कर्मचारी राज्य विमा निगमचं रुग्णालय उभारण्यासाठी करोडी इथली 15 एकर गायरान जमीन देण्यासही कालच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. धारावी पुनर्विकास प्रकल्पासाठी दुग्ध व्यवसाय विकास विभागाची, मुंबईतील कुर्ला इथली साडे आठ एकर जमीन हस्तांतरित करण्यासाठीच्या अटी आणि शर्तींमधील सुधारणांनाही मंत्रिमंडळानं मान्यता दिली. त्याचप्रमाणे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाला पथकराच्या सवलतीसाठी भरपाई देण्याचा निर्णयही मंत्रिमंडळाने घेतला.

**<u>सीडीएस जनरल अनिल चौहान</u>**

ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून भारतीय हवाई दलाने आपली सर्वोत्तम क्षमता सिद्ध करत इतिहास घडवला आहे; असं प्रतिपादन सरसेनाध्यक्ष जनरल अनिल चौहान यांनी काल पुण्यात केलं. ऑपरेशन सिंदूर राबवताना भारताने तंत्रज्ञानाचा सर्वोत्तम उपयोग केल्याचं ते म्हणाले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संरक्षण आणि सामरिक अभ्यास विभागाने, भविष्यकालीन युद्ध आणि युद्ध पद्धती; या विषयावर आयोजित केलेल्या व्याख्यानात ते बोलत होते. भविष्यातील युद्धात मानवी सहभाग कमी होऊन तंत्रज्ञानाचा वापर वाढेल; रोबोटिक्स आणि कृत्रिम बुद्धिमत्तेचाही युद्धात वापर केला जाईल, असं जनरल अनिल चौहान यांनी सांगितलं.

**<u>एसटी</u>**

राज्य मार्ग परिवहन महामंडळातल्या कर्मचाऱ्यांना मूळ वेतनाच्या त्रेपन्न टक्के महागाई भत्ता देण्याची घोषणा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल केली. मुंबईत एसटी महामंडळाच्या विविध संघटनांच्या प्रतिनिधींसमवेत झालेल्या बैठकीत ते बोलत होते. हा निर्णय या महिन्यापासून लागू होणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<u>कोरोना</u>**

राज्यात सध्या काही रुग्णांमध्ये कोविड आजाराची सौम्य लक्षणं आढळून येत आहेत; आरोग्य विभागानं कोविड तपासणी आणि उपचाराची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. त्यामुळे नागरिकांनी घाबरून न जाता काळजी घ्यावी, असं आवाहन आरोग्य विभागानं केलं आहे.

दरम्यान, राज्य सरकारनं कोविड प्रतिबंधासाठी नवीन नियमावली जारी केली आहे. इन्फ्लुएन्झासदृश ताप आणि गंभीर श्वसन आजारानं संक्रमित असलेल्या रुग्णांपैकी, पाच टक्के रुग्णांची तपासणी करण्याच्या सूचना आरोग्य विभागानं सर्व आरोग्य सेवा केंद्रांना दिल्या आहेत.

**<u>पुलोत्सव</u>**

पु.ल. देशपांडे यांचा पंचविसावा स्मृतीदिन आणि सुनिता देशपांडे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त पु. ल. परिवाराच्या सहयोगानं येत्या 9 ते 12 जून या कालावधीत पुण्यात 'ग्लोबल पुलोत्सव' साजरा होणार आहे. यानिमित्त दिला जाणारा पुलोत्सव जीवन गौरव पुरस्कार यंदा ज्येष्ठ सरोद वादक उस्ताद अमजद अली खान यांना, पु. ल. स्मृती सन्मान ज्येष्ठ रंगकर्मी सई परांजपे यांना, विशेष सन्मान दिवंगत प्रभा अत्रे यांना, तर पु. ल. कृतज्ञाता सन्मान चिंतामणी हसबनीस यांना प्रदान केला जाणार आहे. महोत्सवाचे निमंत्रक आणि उच्च तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी काल ही घोषणा केली.

**<u>आयपीएल</u>**

आय पी एल मध्ये रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू विजेता ठरला आहे. काल अहमदाबाद इथं झालेल्या विजेतेपदाच्या लढतीत बंगळुरूने किंग्ज इलेव्हन पंजाबचा 6 धावांनी पराभव केला. प्रथम फलंदाजी करताना बंगळुरूने 190 धावा केल्या तर प्रत्युत्तरादाखल पंजाबने 184 धावा केल्या. पंजाबकडून शशांक सिंहने 30 चेंडूत 61 धावा करून जोरदार प्रयत्न केले. बंगळुरूच्या कृणाल पांड्याला सामनावीर पुरस्काराने गौरविण्यात आलं.

**<u>हवामान</u>**

राज्यात येत्या 24 तासात कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडणीची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे . कोकणात काही ठिकाणी मुसळधार वृष्टि अपेक्षित आहे .

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**